मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# रावेतमधील आवास योजनेतील लाभार्थ्यांना किवळेत सदनिका


## प्रधानमंत्री आवास योजना : महापालिका 755 सदनिकांचे हस्तांतरण करणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत रावेत प्रकल्पातील ९३४ सदनिकांकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने ऑनलाईन पद्धतीने सोडत काढली होती. परंतु महानगरपालिकेकडून रावेत येथील प्रकल्प रद्द करण्यात आला होता. मात्र आता रावेत प्रकल्पातील निवड झालेल्या लाभार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतर्गत प्राप्त होणाऱ्या किवळे येथील सदनिका देण्याचे नियोजन आहे.

दरम्यान या एका सदनिकेची किंमत १३ लाख ७१८ रुपये असून या दरामध्ये ज्या लाभार्थ्यांना लाभ घ्यावयचा आहे, त्या लाभार्थ्यांनी संमतीपत्र महानगरपालिकेकडे १५ मार्च २०२५ पर्यंत सादर करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

किवळे येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ७५५ सदनिका




उभारण्यात येत आहेत. या सदनिका आता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत रावेत प्रकल्पातील निवड झालेल्या पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणार आहेत. या ७५५ सदनिकांपैकी ३७८ सदनिका सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना, २२६ सदनिका इतर मागासवर्गीय प्रवर्गातील लाभार्थ्यांना, ९८ सदनिका अनुसुचित जाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना, ५३ सदनिका अनुसुचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना देण्यात येणार आहेत. एकूण ७५५ सदनिकांपैकी ३८ सदनिका या दिव्यांग लाभार्थ्यांसाठी राखीव असणार आहेत.

रावेत प्रकल्पातील लाभार्थी हे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या धोरणानुसार संमतीपत्र देऊन या सदनिकांचा लाभ घेऊ शकतात. लाभार्थ्यांनी झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडे संमतीपत्र सादर करावे. या संमतीपत्राचा मसुदा लाभार्थ्यांनी चिंचवडगांव येथील चाफेकर चौकात असणाऱ्या उप आयुक्त, झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाच्या कार्यालयातून घ्यावा, व आवश्यक माहिती भरून सादर करावा. लाभार्थ्यांना सदनिकांचा लाभ घेताना संमतीपत्रासोबत आवश्यक कागदपत्रेही सादर करावी लागणार आहेत. त्यानंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे निकष पुर्तता करणाऱ्या अर्जदारांनाच किवळे प्रकल्पातील सदनिका वाटप करण्यात येणार आहेत. याशिवाय सदनिका हस्तांतरणाबाबतची प्रक्रियेमध्ये बदल करणे, या प्रक्रियेला स्थगिती देणे अथवा रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवले आहेत.

### संमतीपत्रासोबत जोडावी लागणारी कागदपत्रे

- उत्पन्न दाखला, १ वर्षाचा आयकर परतावा
- अर्जदाराचे जात प्रमाणपत्र
- अर्जदाराचे जात वैधता प्रमाणपत्र
- अर्जदार व कुटुंबातील सदस्यांचे आधार कार्ड
- अर्जदार व सह अर्जदार यांचे पॅनकार्ड
- अर्जदाराचे बँक पासबुक छायांकीत प्रत, पासबुक खाते तपशिल
- पृष्ठ, रद्द केलेला धनादेश
- अर्जदाराचे मतदान ओळखपत्र
- भाडे करार
- संमतीपत्र
- वीज बिल
- अधिवास प्रमाणपत्र
- दिव्यांग प्रमाणपत्र

> किवळे येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या ७५५ सदनिका महानगरपालिकेकडे उपलब्ध होणार आहेत. या सदनिका आता रद्द झालेल्या रावेत प्रकल्पातील पात्र लाभार्थ्यांना देण्याचे नियोजन असून एका सदनिकेची किंमत १३ लाख ७१८ रुपये इतकी आहे. ज्या लाभार्थ्यांना या दरामध्ये लाभ घ्यावयाचा आहे, त्यांनी संमतीपत्र सादर केल्यास प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य यानुसार वितरण करण्याचे नियोजन आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका.**

---

# अनधिकृत आरओ तसेच वॉटर एटीएम प्लांट्सच्या मागे महापालिकेचा 'ससेमिरा'

## पाण्याच्या 5 हजार 905 नमुन्यांची तपासणी : आयुक्त शेखर सिंह यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

गिलियन बेरे सिंड्रोमचा (GBS) प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. महानगरपालिकेने आतापर्यंत शहरातील २४ अनधिकृत खासगी आरओ प्लांट्सवर कारवाई केली आहे. तसेच २७ वॉटर एटीएमवर देखील कारवाई करून ते बंद करण्यात आले आहेत, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

शहरात असणाऱ्या ६ विहिरींसह आतापर्यंत विविध ठिकाणचे एकूण ५ हजार ९०५ पाण्याचे नमुने तपासण्यात आले असल्याचेही ते म्हणाले. महानगर पालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात झालेल्या पत्रकार परिषदेस अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उप आयुक्त अण्णा बोदडे, शिक्षण विभागाचे सहायक आयुक्त विजयकुमार थोरात, विशेष अधिकारी किरण गायकवाड उपस्थित होते.



गिलियन-बॅरे सिंड्रोम (GBS) प्रादुर्भाव व वाढत्या सार्वजनिक आरोग्यविषयक समस्यांच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध ठिकाणचे पाण्याचे नमुने तपासण्यात येत आहेत. महानगरपालिकेच्या वतीने वॉटर एटीएम आणि खासगी आरओ प्लांट्सची देखील तपासणी करण्यात येत आहे. यामध्ये दूषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारे अनधिकृत वॉटर एटीएम आणि आरओ प्लांट्स आढळताच त्यावर तात्काळ कारवाई केली जात आहे. त्यानुसार आतापर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील २४ आरओ व २७ वॉटर एटीएम प्लांट्सवर कारवाई केली आहे, असेही आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

# शहरातील आणखी 17 रस्ते होणार सुपर फास्ट

## मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या सातवर : एकूण रुग्णांच्या संख्येतही वाढ

पुणे | प्रतिनिधी

शहरातील प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी करून वाहतुकीचा वेग वाढविण्यासाठी महापालिकेने हाती घेतलेले ‘मिशन 15’ हे पूर्ण झाल्यानंतर आता नव्याने 17 रस्त्यांची निवड करून ‘मिशन 17’ हाती घेतले आहे. त्यामुळे आता आणखी 17 रस्ते सुपर फास्ट होणार असून, त्यासंबंधीच्या कामाला पथ विभागाने प्रत्यक्ष सुरुवात केली आहे.



पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी ही माहिती दिली. शहरातील ज्या रस्त्यांचा वापर सर्वात अधिक होतो, अशा रस्त्यांची पथ विभागाने पहिल्या टप्प्यात ‘मिशन 15’अंतर्गत निवड केली होती. या रस्त्यांवरील वाहतुकीला वेग मिळावा, यासाठी आवश्यक सर्व सुधारणा या उपक्रमांतर्गत करण्यात येत आहेत. त्यात प्रामुख्याने अतिक्रमणे काढून रस्त्यांची डागडुजी, त्यावर डांबरीकरण करून रस्ते विकसित केले जातात. त्यानुसार महापालिकेने पहिल्या टप्प्यात हाती घेतलेल्या 15 रस्त्यांची कामे जवळपास पूर्ण झाली आहेत. त्यानंतर आता आणखी नव्याने 17 रस्त्यांची निवड करण्यात आली असून, या रस्त्यांवरील सर्व अतिक्रमणे हटवून, चेंबर दुरुस्ती, अनावश्यक ठिकाणचे ग्रेड सेपरेटर काढून त्यांचे नव्याने डांबरीकरण केले जाणार आहे.

याबाबत पावसकर म्हणाले, ‘मिशन 17’अंतर्गत निवड केलेल्या सर्व रस्त्यांचा आता सर्व्हे सुरू करण्यात आला आहे. या रस्त्यांवरील कोणकोणत्या बाबींवर कामे करावी लागणार आहेत, त्याची यादी करण्यात येत असून, त्यानंतर प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल. त्यामुळे शहरातील रस्त्यांची गुणवत्ता सुधारून वाहतुकीला गती मिळेल, असा विश्वास पावसकर यांनी व्यक्त केला.

### ‘मिशन 17’अंतर्गत निवडलेले रस्ते

» सासवड रस्ता, कात्रज-मंतरवाडी बायपास, जुना एअरपोर्ट रस्ता, आळंदी रस्ता, जुना पुणे-मुंबई हायवे, शास्त्री रस्ता, नेहरू रस्ता, टिळक रस्ता, साधू वासवानी रस्ता, बंडगार्डन रस्ता, डॉ. आंबेडकर रस्ता, एम. जी. रस्ता, प्रिन्स ऑफ वेल्स रस्ता, कोंढवा मुख्य रस्ता, जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्ता, सेनापती बापट रस्ता.

# कुदळवाडीत सलग चौथ्या दिवशीही महापालिकेची कारवाई सुरूच

## 96 एकर जागेवरील 806 अनधिकृत पत्राशेड, भंगार दुकाने ‘जमीनदोस्त’

पिंपरी | प्रतिनिधी

चिखली येथील कुदळवाडी भागात ९६ एकर भूभागावरील सुमारे ४१ लाख चौरस फूट क्षेत्रफळ असलेली ८०६ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. सलग चौथ्या दिवशी सुरू असलेल्या या कारवाईमध्ये अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामांचा समावेश होता.



शहरातील नियोजित विकास आरक्षणे आणि नागरिकांच्या सुविधांसाठी असलेल्या जागेवरील अतिक्रमण हटविण्यासाठी बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आणि धडक कारवाई पथकांमार्फत कुदळवाडी येथे ८ फेब्रुवारी २०२५ पासून अनधिकृत बांधकाम निष्कासनाची कारवाई करण्यात येत असून आज कारवाईचा चौथा दिवस होता.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या कारवाईमध्ये आज अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उपआयुक्त मनोज लोणकर, क्षेत्रीय अधिकारी राजेश आगळे, सुचेता पानसरे, अमित पंडित, किशोर ननवरे, महेश वाघमोडे, अजिंक्य येळे, शितल वाकडे, श्रीकांत कोळप यांच्यासह कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता सहभागी झाले आहेत.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांच्या अधिपत्याखाली पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार, संदीप डोईफोडे, विवेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

आज अखेरपर्यंत सुमारे २ हजार ३१७ बांधकामांवर करण्यात आली निष्कासनाची कारवाई

महापालिकेच्या वतीने कुदळवाडी येथे सुरू असलेल्या या निष्कासनाच्या कारवाईमध्ये आज अखेरपर्यंत सुमारे १६१ लाख चौरस फूट क्षेत्रफळ असलेल्या एकूण २ हजार ३१७ बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच सुमारे ३७२ एकर भूभागावर ही कारवाई करण्यात आली असून यापुढेही ही कारवाई सुरूच राहणार आहे.

### आज अखेरपर्यंत सुमारे 2 हजार 317 बांधकामांवर करण्यात आली निष्कासनाची कारवाई


» महापालिकेच्या वतीने कुदळवाडी येथे सुरू असलेल्या या निष्कासनाच्या कारवाईमध्ये आज अखेरपर्यंत सुमारे १६१ लाख चौरस फूट क्षेत्रफळ असलेल्या एकूण २ हजार ३१७ बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच सुमारे ३७२ एकर भूभागावर ही कारवाई करण्यात आली असून यापुढेही ही कारवाई सुरूच राहणार आहे.

# तुकोबांचे मंदिर वर्षभरात पूर्ण होणार

## मंदिराचे 70 टक्के काम पूर्ण : भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांची चिंतनभूमी असणाऱ्या श्रीक्षेत्र भंडारा डोंगरावर तुकोबारायांच्या आकाशाएवढ्या कार्याला साजेसे भव्य-दिव्य मंदिर व्हावे, हे वारकरी संप्रदायाचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होत आहे. मंदिराचे ७० टक्के काम पूर्ण झाले असून, येत्या वर्षभरात लोकार्पण सोहळा करण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद व मंदिर बांधकामाचे नियोजन करणारे गजानन शेलार यांनी दिली.



अयोध्येतील राम मंदिर ज्यांच्या स्थापत्यकलेतून उभारले गेले, ते चंद्रकांत सोमपुरा, निखिल सोमपुरा बंधू स्थापत्यविशारद म्हणून येथे कार्यरत आहेत. मंदिराच्या निर्मितीची जबाबदारी रमेशचंद्र सोमपुरा आणि परेश सोमपुरा या पिता-पुत्रांनी घेतली आहे.

### छत्रपती शिवाजी महाराज आणि तुकोबांचेही शिल्प

» **जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराज व रयतेचे राज्य ही लोकशाहीपूरक संकल्पना ज्यांनी प्रत्यक्षात प्रथम अमलात आणली, ते हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे दिव्य शिल्पही साकारले जाणार आहे.**

गांधीनगर (गुजरात) येथील जगप्रसिद्ध अक्षरधाम मंदिराच्या आधारावर संत तुकाराम महाराजांचे भव्य-दिव्य मंदिर निर्माणाचे कार्य सुरू आहे. मंदिराची लांबी १७९ फूट, उंची ८७ फूट व रुंदी १९३ फूट असून, मंदिराला तीन भव्य कळस आहेत. मंदिराचा घुमट ३४ फूट बाय ३४ फूट असून, १३.५ बाय १३.५ फूट आकाराची एकूण ५ गर्भगृहे मंदिरात असतील. मंदिराच्या मध्यभागी मुख्य जागेवर श्री विठ्ठल-रुख्मिणीची मूर्ती व या मूर्तीकडे पाहात भक्तीमध्ये दंग झालेल्या श्री संत तुकाराम महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. मंदिराच्या बाहेरील खांब चौरसाकृती व आतील खांब अष्टकोनाकृती असून, त्यावर ९०० वैष्णवांच्या मूर्तींचे सुंदर कोरीव काम असणार आहे.

# पुनावळेतील कचरा डेपो आरक्षण 'जैसे थे'

## राज्य शासनाचा लेखी निर्णय नाहीच : आरक्षण रद्द झाल्याच्या नागरिकांच्या आनंदावर विरजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुनावळे येथील प्रस्तावित कचरा डेपो रद्द व्हावा म्हणून स्थानिक रहिवासी कित्येक वर्षांपासून पाठपुरावा करत होते. याबाबत कचरा डेपो रद्द झाला. त्या जागेवर आता ऑक्सिजन पार्क उभारण्यात येईल, असे सांगण्यात येत होते. मात्र, कचरा डेपोवर लक्ष्यवेधी होऊन विधिमंडळ हा प्रश्न गाजला होता. परंतु, पुनावळे कचरा डेपोला स्थगिती देऊन हे आरक्षण रद्द केल्याबाबत महापालिकेला राज्य शासनाने लेखी कळवले नाही. त्यामुळे पुनावळेतील कचरा डेपो आरक्षण 'जैसे थे' आहे. यामुळे पुनावळेत कचरा डेपो होणार की नाही, यावर प्रश्न निर्माण झाला आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाढत्या नागरिकरणामुळे कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. मोशीतील कचरा डेपोच्या जागेवर डोंगर उभारला आहे. गतवर्षी पुनावळेत कचरा डेपो उभारण्यासाठी महापालिका प्रशासनाने हालचाली सुरू केल्या होत्या. मात्र, पुनावळेत कचरा डेपो होऊ नये, यासाठी नागरिकांनी जोरदार विरोध केला. कचरा डेपोचा विषय अधिवेशनातही गाजल्यानंतर १८ डिसेंबर २०२३ रोजी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी कचरा डेपोला स्थगिती दिल्याची विधिमंडळात घोषणा केली होती. त्यानंतर पुनावळे येथील प्रस्तावित कचरा डेपो रद्द झाला म्हणून स्थानिक नागरिक आनंद साजरा केला होता. याबाबत सातत्याने पाठपुरावा केल्याने कचरा डेपो रद्द झालेला नाही. तसेच त्या जागेवर ऑक्सिजन पार्क उभारण्यात येईल, यावर देखील प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात दररोज १२०० ते १३०० टन कचरा निर्माण होतो. हा सर्व कचरा सध्या मोशी येथील कचरा डेपोत डम्पिंग केला जातो. ओल्या कचऱ्यापासून खत निर्माण केले जात असून, सुका कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प सुरू केला आहे. प्लास्टिक कचऱ्यापासून इंधन निर्मिती केली जात आहे. तसेच, प्लास्टिकचे ब्लॉक तयार करून प्लास्टिक साहित्य उत्पादक कारखान्यांना पुरवले जाते. मोशी कचरा डेपोत १९९१ पासून कचरा टाकला जात आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा साचून डोंगर तयार झाले आहेत. ते हटवण्यासाठी कोट्यवधीचा बायोमॉनिंग प्रकल्प दोन टप्प्यात राबवला जात आहे.

> “ पुनावळे कचरा डेपोचा विषय संवेदनशील आहे. शहराला दुसऱ्या कचरा डेपोची आवश्यकता आहे. परंतु, त्याला विरोध आहे. नागरिकांशी संवाद साधला. पण, त्यांची समजूत काढण्यात यश आले नाही. डेपो रद्द झाल्याबाबत शासनाचे कोणतेही पत्र आले नाही. घर खरेदी करताना आसपास कोणते प्रकल्प येणार आहेत, याची माहिती नागरिकांनी घेतली पाहिजे. कोठे, कोणते आरक्षण प्रस्तावित आहे, याची माहिती विकास आराखड्यात असून हा आराखडा पालिकेच्या संकेतस्थळावर आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

नागरिकरण झपाट्याने वाढत असतानाच भविष्याची गरज ओळखून महापालिकेकडून पुनावळे येथे २००८ मध्ये कचरा डेपोचे आरक्षण टाकण्यात आले आहे. तेथील २२.८ हेक्टर जागा कचरा डेपोसाठी मंजूर करण्यात आली. पुनावळेतील जागेवर वृक्ष आहेत, या ठिकाणी कचरा डेपो झाल्यास येथील झाडे तोडावी लागतील. त्यामुळे वन विभागाला झाडे लावण्यासाठी जागा देणे बंधनकारक आहे. तसेच महापालिकेने आत्तापर्यंत वनीकरणासाठी ३ कोटी ५७ लाख १३ हजार ७३० रुपये वेळोवेळी अदा केले आहेत. मात्र, ही जागा अद्याप ताब्यात घेण्यास महापालिकेस यश आले नसून १७ वर्षांपासून जागेचे भिजत घोंगडे कायम आहे.

दुसरीकडे पुनावळेतील २२.८ हेक्टर जागेच्या बदल्यात महापालिकेने चंद्रपूर जिल्ह्यातील वन विभागाच्या शेजारील खासगी जमीन सुचवण्यात आली.

# कात्रज डेअरीच्या विस्तारीकरणाचा मार्ग मोकळा

## पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या जमीनीवर असलेले एमपीजी 1 चे आरक्षण रद्द

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या जमीनीवर असलेले एमपीजी १ चे आरक्षण रद्द करुन डेअरी प्रक्रिया प्रकल्पासाठी आरक्षित करण्यासाठीच्या प्रयत्नांना यश आले आहे. या जमीनीयर एनडीडीबी (राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड) च्या माध्यमातून (अर्थसह्यातून) डेअरी विस्तारीकरणाच्या डीआयडीएफच्या १०० कोटीच्या मंजूर प्रकल्पाचा आराखडा पूर्ण केल्याची माहिती पुणे जिल्हा दूध संघाचे मावळते अध्यक्ष भगवान पासलकर यांनी दिली आहे.




पासलकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असून त्यांनी त्यांच्या कार्यकाळाचा ऑक्टोबर २०२३ ते फेब्रुवारी २०२५ मध्ये केलेल्या कामकाजाचा लेखाजोखा मांडला. संघाच्या नफ्यामध्ये अडीच कोटी रुपयांची वाढ झाली असून कोंढापुरी येथे असलेल्या पशुखाद्य कारखान्यातील पशुखाद्याची विक्रीमध्ये १५० मेट्रिक टन वरून ५०० मेट्रिक टन इतकी प्रतिमाह वाढ झाली आहे. पशुखाद्य खरेदी करणाऱ्या दूध उत्पादक शेतकऱ्यांनाही प्रतिलिटर दीड रुपयाप्रमाणे १ कोटी ७० लाख रुपयांचे अनुदान दिल्याची माहिती त्यांनी दिली.

दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध दर फरक प्रति लिटर रुपया प्रमाणे अदा केला असून दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीमध्ये वाढ होण्यासाठी बाहेरील तज्ञ मार्केटिंग सल्लागाराची नेमणूक केल्याने संघाचे दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीमध्ये वाढ झाली आहे. संघाची दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी पार्लर अद्यावत करण्यात आलेली आहेत. यामुळे विक्री मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

शासनाचे ५ रुपयांचे अनुदान मिळविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांती आतापर्यंत २ कोटी रुपयांचे अनुदान संघाच्या दूध उत्पादकांना मिळालेले आहे. संघातील सेवकांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी संघातील ३३३ सेवाकांना विविध पदावर पदोन्नती देण्यात आली असून पुणे महापालिकेच्या माध्यमातून २ कोटी रुपयांची सीमाभिंत मंजूर करून प्राथमिक कामास सुरवात करण्यात आली असल्याचीही माहिती पासलकर यांनी दिली आहे.

# ‘जनाई-शिरसाई’ योजनेच्या पाईपलाईनसाठी 438 कोटी रूपयांचा निधी मंजूर

## उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती व पुरंदर तालुक्यातील अवर्षणग्रस्त भागासाठी लाभदायी असणाऱ्या जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीत रूपांतरित करण्यासाठी 438 कोटी 48 लाख रुपयांच्या कामाला आज मंत्रिमंडळाने प्रशासकीय मान्यता दिली. या योजनेमुळे दौंड, बारामती व पुरंदर तालुक्यातील एकूण 14 हजार 80 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या योजनेसाठी ही मान्यता मिळाली आहे.





जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रूपांतरण करण्याच्या कामासाठी मंत्रीमंडळाच्या बैठकीत विस्तार व सुधारणा अंतर्गत 438 कोटी 48 लाख रुपयांच्या प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या योजनेअंतर्गत नवीन मुठा उजव्या कालव्याद्वारे 94 किमी अंतरावर वरवंड तलावात पाणी सोडले जाते. तेथून उपसा करून 8 हजार 350 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल. या योजनेत एकूण 18 तलाव समाविष्ट असून, सध्या 13 तलाव पाण्याने भरले जात आहेत.

शिरसाई उपसा सिंचन योजनेंतर्गत नवीन मुठा उजव्या कालव्याद्वारे 138 किमी अंतरावर शिर्सुफळ तलावात पाणी सोडले जाते. तेथून उपसा करून 5 हजार 730 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या योजनेत 47 तलावांचा समावेश आहे, त्यापैकी 32 तलाव पाण्याने भरले जात आहेत. नलिका प्रणालीमुळे भूसंपादनाची गरज राहत नाही. तसेच मशागतीस कोणताही अडथळा येत नाही. नलिका वितरणाद्वारे समन्यायी पाण्याचे वाटप करणे सुलभ होते. नलिका वितरण प्रणालीचा देखभाल दुरुस्ती व परिचलनाचा खर्चही तुलनेने कमी राहतो. डोंगर उतारावरील, खोल खोदाईतील व काळ्या मातीतील कालव्यांवर तुलनेने देखभाल-दुरूस्तीचा खर्च जास्त राहतो. खडकवासला प्रकल्पातून सदर योजनेस पाणी मिळते तरी सदर योजना बंदिस्त नलिकेमध्ये रूपांतरीत केल्याने पाण्याचा कार्यक्षम वापर होणार आहे. तसेच पाण्याची बचत होऊन पुणे महानगरपालिकेला पाणी पुरवठ्यामुळे खडकवासला प्रकल्पावरील येणारा ताण कमी होणार आहे.

दौंड, बारामती व पुरंदर तालुक्यातील आवर्षणग्रस्त भागातील शेतीला पाणी मिळण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे मंत्रीमंडळाने या कामासाठी प्रशासकीय मान्यता दिली आहे, ही योजना तिन्ही तालुक्यातील 14 हजार 80 हेक्टर अवर्षणग्रस्त क्षेत्रासाठी वरदान ठरणार आहे.